# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी--५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(महाविद्यालयीन विभाग)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५
E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

गो.वि./म.वि /1241/२०१९ — दिनांकः 11/07/२०१९

**अत्यंत महत्वाचे/तातडीचे/कालमर्यादित**

## परीपत्रक

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :— शैक्षणिक संस्थामधील शिक्षकीय रिक्त पदांची माहीती https://nherc.in या पोर्टलवर भरण्याबाबत

संदर्भ :—१. प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण ) महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक ११/०७/२०१९ ला प्राप्त पत्र

महोदय

उपरोक्त संदर्भाकीत विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते कि, शैक्षणिक संस्थामधील शिक्षकिय रिक्त पदांची माहीती https://nherc.in या पोर्टलवर भरण्याबाबत उच्च शिक्षण संचालनालयाचे तातडीचे निर्देश प्राप्त झालेले असुन सदर निर्देश आपल्या अवलोकनार्थ व कार्यवाहीस संलग्नित करण्यात येत आहे.

ज्या महाविद्यालयाने आजतागायत कार्यवाही घेतलेली नाही. अशा महाविद्यालयांनी https://nherc.in या पोर्टलवर शिक्षकीय रीक्त पदांची माहीती भरण्याची कार्यवाही तातडीने घ्यावी व कार्यवाहीचा अहवाल त्वरीत विद्यापीठामध्ये सादर करावा. सदर माहीती पोर्टलवर न भरल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालय व प्राचार्याची राहील.

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र संलंग्नित :— उपरोक्तप्रमाणे

Gmail 6712 11/07/19

Registrar Gondwana University Gadchiroli <registrar.gondwanauniversity@gmail.com>

# शैक्षणिक संस्थामधील शिक्षकीय रिक्त पदांची माहिती htteps://nherc.in या पोर्टलवर भरणेबाबत.

1 message

"विशी शाखा, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य" <vishi.dhepune@gov.in> Wed, Jul 10, 2019 at 11:28 AM

To: kksuregistrar1997@gmail.com, registrar@nagpuruniversity.nic.in, registrar@unishivaji.ac.in, registrar@bamu.net, reg@sgbau.ac.in, registrar@fort.mu.ac.in, registrar@sus.ac.in, "@nic.in, registrar"@sndt.ac.in, registrar.gondwanauniversity@gmail.com, regis@unipune.ac.in, srtmunregistrar@gmail.com

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
महाविद्यालयीन विभाग
आवक क्र. 1829 दिनांक 11/7/19
जावक क्र. ....... दिनांक .......

महोदय / महोदया,

आपल्या विद्यापीठाच्या अधिनस्त असलेल्या अशासकीय कायम विनाअनुदानित महाविद्यालयांची शिक्षकीय रिक्त पदांची माहिती https://nherc.in या वेबपोर्टलवर भरण्यासंदर्भात त्वरित कार्यवाही करून अहवाल तात्काळ संचालनालयास सादरकरावा.

तसेच ज्या अशासकीय कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनी पोर्टलवर नोंदणी केलेली आहे, तथापि रिक्त पदांचीमाहिती भरलेली नाही त्यांनी नोंदणी नंतरची कार्यवाही पूर्णकरून अहवाल तात्काळ संचालनालयास सादरकरावा.

आपला विश्वासू,

(सुयश दुसाने)
प्रशासन अधिकारी,
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य,
मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१

2 attachments

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
Web : www.dhepune. in E-Mail : dhepune@nic.com
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६११११५३.
क्र.: उशिसं//मवि-२/एमएचआरडी/पोर्टल-माहिती /२०१९/८९८ दिनांक: ०४.०७.२०१९

ईमेलद्वारे -

परिपत्रक

**विषय : शैक्षणिक संस्थांमधील शिक्षकीय रिक्त पदांची माहिती htteps://nherc.in या पोर्टलवर भरणेबाबत..**

संदर्भ :१. शासनपत्र क्र.: संकीर्ण २०१९/प्र.क्र.२४९/मशि-५ दि. १८.६.२०१९
२. शासनपत्र क्र.: संकीर्ण २०१९/प्र.क्र.२४९/मशि-५ दि. ४.७.२०१९

केंद्र शासनाच्या दिनांक ०६.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक संस्थांमध्ये रिक्त पदभरतीचा समयबध्द कार्यक्रम राबविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ०४.०६.२०१९ रोजी याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. या समयबध्द कार्यक्रमाचा भाग म्हणून शैक्षणिक संस्थांमधील (खाजगी व सार्वजनिक विद्यापीठे, संलग्नित खाजगी महाविद्यालये ) संपूर्ण रिक्त पदाची माहिती https://nherc.in वर भरण्याचे निर्देश केंद्र व राज्य शासनाद्वारे देण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने उर्वरीत अशासकीय अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयामधील तसेच अकृषी व खाजगी विद्यापीठातील रिक्त पदांची माहिती https://nherc.in या पोर्टलवर तात्काळ भरावी व त्याबाबतचा अहवाल संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांचेकडे सादर करण्यात यावा.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

प्रति,

१. प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
२. प्राचार्य, सर्व अशासकीय कायम विनाअनुदानित महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
३. कुलसचिव, सर्व अकृषी व खाजगी विद्यापीठे महाराष्ट्र राज्य.

महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.२४९/मशि-५
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक, मादामकामा रोड,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक १८ जून, २०१९

प्रति,
संचालक, उच्च शिक्षण
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे

विषय:- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त शैक्षणिक संस्थांमधील रिक्त पदांची माहिती पोर्टलवर भरण्यासंदर्भात

महोदय,

केंद्र शासनाच्या दिनांक ६.६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये शैक्षणिक संस्थांमध्ये रिक्त पदभरतीचा समयबद्ध कार्यक्रम राबविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक ४.६.२०१९ रोजी याबाबत मार्गदर्शक सूचनांही निर्गमित केलेल्या आहेत. या समयबद्ध कार्यक्रमाचा भाग म्हणून शैक्षणिक संस्थांमधील {खाजगी व सार्वजनिक - विद्यापीठे, सलंग्नित महाविद्यालये (शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी)} संपूर्ण रिक्त पदांची माहिती पोर्टलवर url:- https;//nherc.in वर दिनांक २५ जून, २०१९ पूर्वी भरण्याचे निर्देश केंद्र शासनाने दिलेले आहेत. या विषयासंदर्भात सचिव, (उच्च शिक्षण) केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय हे दिनांक २५.०६.२०१९ रोजी व्हीडीओ कॉन्फरसिंगद्वारे आढावा घेणार असल्याने तत्पूर्वी या प्रकरणी कार्यवाही होणे आवश्यक आहे. तरी याबाबत पुढील सूचना विचारात घेऊन रिक्त पदांची माहिती url:- https;//nherc.in या पोर्टलवर भरण्यासंदर्भातील कार्यक्रम आखून याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. याबाबतचा दैनिक अहवाल विभागास पाठविण्यात यावा.

१) **खाजगी संस्था:-** सर्व खाजगी/अभिमत विद्यापीठे व खाजगी महाविद्यालये/ शैक्षणिक संस्थांना नमूद पोर्टलवर विहित मुदतीत माहिती भरण्याबाबत कळविण्यात यावे.

२) **अनुदानित संस्था:-** दिनांक १.१०.२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर आधारित पदांची अनुज्ञेयता संबंधित सहसंचालक कार्यालयाने महाविद्यालयांना कळविली असल्याने व त्या आधारे पदभरतीची मोहीम सध्या राबविण्यात येत असल्याने या माहितीच्या आधारे रिक्त पदांची माहिती संबंधित पोर्टलवर भरणे आवश्यक असल्याने संस्थांनी परस्पर माहिती भरल्यास त्यामध्ये तफावत होईल, यास्तव या पोर्टलवर महाविद्यालयांनी परस्पर माहिती न भरता सदरहू माहिती भरण्याकरिता संबंधित सहसंचालकांनी त्यांच्या अधिनस्त अनुदानित महाविद्यालयांच्या कार्यशाळा आयोजित करुन, भरण्यात येणारी

माहिती सहसंचालकांनी प्रमाणित करुन कार्यशाळेमध्ये सदर माहिती महाविद्यालयांकडून भरली जाईल, याची खात्री करावी.

३) **शासकीय महाविद्यालये:-** या संदर्भात शासनाने मंजूर केलेल्या आकृतिबंधानुसार रिक्त पदांची माहिती पोर्टलवर भरणे आवश्यक असल्याने संचालक, उच्च शिक्षण यांनी प्रमाणित केल्यानंतरच सदरहू माहिती पोर्टलवर भरण्याची कार्यवाही शासकीय महाविद्यालयांनी करावी.

४) **विद्यापीठे:-** या संदर्भात शासनाने मंजूर केलेल्या आकृतिबंधानुसार रिक्त पदांची माहिती पोर्टलवर भरणे आवश्यक असल्याने संचालक, उच्च शिक्षण यांनी प्रमाणित केल्यानंतरच सदरहू माहिती पोर्टलवर भरण्याची कार्यवाही अकृषी विद्यापीठांनी करावी.

आपली

(रोहिणी भालेकर)
उप सचिव (मशि)